# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in pgadmission@sus.ac.in

NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA2.96)

जा.क्र.पुअहोसोविसो/पी.जी.प्रवेश/२०२४/ 1541 दिनांक 20 JUL 2024

परिपत्रक- ४४

### सेंट्रल सेंक्टर, अपंग (दिव्यांग)व अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना २०२४-२५

विषय:- १०० टक्के केंदपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेंक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२४-२५ साठी अंमलबजावणी करणे बाबत.

संदर्भ:- शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५ /सीएसएस.

प्रस्तुत विद्यापीठ संकुलात / महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थीनींना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी सेंट्रल सेंक्टर, अपंग व अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी नवीन व नुतनीकरण शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र सादर करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे.

केंद्र शासन पुरस्कृत सेंट्रल सेंक्टर, अपंग व अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती सवलतीकरिता www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम कालावधी दि.३१/१०/२०२४ पर्यंत निर्धारित करण्यात आलेला आहे. तरी विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांनी संकुलामार्फत अर्ज भरून पी.जी.प्रवेश विभागाकडे सादर करावी. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्याच महाविद्यालयात अर्ज जमा करण्यात यावी. वरील मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार विद्यापीठ / महाविद्यालये केले जाणार नाही. तसेच जे विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरून त्याची प्रत सादर करणार नाहीत त्याना शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास त्यास विद्यापीठ/ महाविद्यालय जबाबदार राहणार नाही, याची विद्यार्थांनी नोंद घ्यावी.

अर्ज सादर करत असताना सोबत खालील प्रमाणे कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र, मागील वर्षाची गुणपत्रिका व प्रवेश शुल्क भरलेली पावती

२. उत्पन्नाचा दाखला- २०२३-२४ (अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू. ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.) तसेच दिव्यांग विद्यार्थीसाठी पालकाचे वार्षिक उत्पन्न रू. २.५ लाखापेक्षा अधिक नसावे.)

३. विद्यार्थ्यांचा रहिवाशी दाखला किंवा शिधापत्रिका/वीज बिल/निवडणूक ओळखपत्र/दूरध्वनी बिल/आधारकार्डची प्रत या पैकी एक पुराव्याची छायांकित प्रत जोडावी.

४. राष्ट्रीयकृत बँकमध्ये खाते क्रमाक (IFSC कोड व MICR) व पासपोर्ट आकाराचे फोटो

(डॉ.श्रीकांत अंधारे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:- १. मा.संचालक/विभाग प्रमुख, सर्व संकुल/ अधिविभाग पु.अ.हो.सोलापूर विद्यापीठ सोलापूर
२. मा. प्राचार्य/प्राचार्या सर्व संलग्नित महाविद्यालय, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूर

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**web: www.dhepune.gov.in** **E-mail: schol.dhepune@gov.in**

फोन नं.०२०/२९७०७०९८/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०२४-२५/सीएसएस/ दि.

**परिपत्रक**

**विषय :- १०० टक्के केंद्रपुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती ची नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल मार्फत सन २०२४-२५ साठी अंमलबजावणी करणे बाबत...**

**संदर्भ :- केंद्रशासनाचे दिनांक ०१.०७.२०२४ रोजीचा ई-मेल.**

उच्च माध्यमिक ( इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान तसेच व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७** इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

**केंद्रशासनामार्फत नवीन शिष्यवृत्तीसाठी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत दिनांक ३१.१०.२०२४ अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.**

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन / सुधारीत प्राप्त सूचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी करावे. होकेशनल

## ❖ किमान पात्रता व अटी :

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न **रु. ४.५** लाखापेक्षा अधिक नसावे.
४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.

## ❖ अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-

- **नवीन मंजूरी** / (Fresh)-

१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
२. पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.

- **नूतनीकरण (**Renewal)-

    १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

❖ **नविन मंजूरी आणि नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती :-**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि. ३१.१०.२०२४** ही आहे.
३. नवीन मंजूरीसाठी (Fresh) सदर योजनेसाठी HSC, CBSE व ICSE बोर्डचे टॉप २०th Percentile यादीतील सर्व विद्यार्थी या योजनेचा अर्ज करण्यास पात्र असतील. सदर शिष्यवृत्तीसाठी उच्च शिक्षण कार्यालयामार्फम केवळ उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची HSC बोर्डचे विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.
४. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करुन अर्ज भरावा.
५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँकखात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत होईल.
६. विद्यार्थ्याचा बँक खाते चालू स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.
७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील.
८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (standard operating procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.
९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरुन, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावी.
१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा.
११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)
१२. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज करता येईल. (परंतू ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

❖ **विद्यापीठ / महाविद्यालय / संस्थेसाठी सूचना :-**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजूर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुण देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२४-२५ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव /प्राचार्य / संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरुन सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 16-07-2024 13:15:06

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ०१

प्रत,
१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
१. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे ०५
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई ०१
३. संचालक, आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ०१
४. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (कृषी/अकृषि/तंत्र/पशुविज्ञान/आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर 413001

दूरध्वनी क्र. 0217-2324055 E-mail - jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. विससं/उशि/सोविसो/2024/ दि. 15/07/2024

प्रति,

1. कुलसचिव,
   पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ, सोलापूर
2. प्राचार्य,
   सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये,
   सोलापूर विभाग.

विषय : सन 2024-25 पासून केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरणेकरिता विदयार्थ्यांचे ओटीआर (OTR) व फेस ऑथेंटिकेशन करणेबाबत

संदर्भ : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.I/457391/2024 दि.5/7/2024

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकीत पत्र व त्यासोबतच्या केंद्र शासनाच्या दि.1.7.2024 च्या ई-मेलची प्रत यासोबत जोडली आहे. सदर पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार पत्रामध्ये नमुद केल्यानुसार तसेच त्यासोबतच्या सर्व सूचना विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात

तरी, संदर्भांकीत पत्रात नमुद केलयानुसार आपण विहित कालमर्यादेत कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

Signed by
Nalini Khemraj Tembhekar
Date: 16-07-2024 12:55:10

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

E-647290

HEPN-SCH2011/16/2024-SCHW1 I/457391/202

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-411 001


web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153

क्र.उशिसं-/शिष्य/2024-25 दिनांक



विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग सोलापूर
कार्यासन- आ.क्र.
क.प्र.अ. प्र.अ. वि.स.सं.


**परिपत्रक**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय : सन 2024-25 पासून केंद्रशासन पुरस्कत शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरणेकरिता विद्यार्थ्यांचे ओटीआर (OTR) व फेस-ऑथेंटिकेशन करणेबाबत..**

संदर्भ : केंद्रशासनाचा दि. 01.07.2024 रोजीचा ई-मेल.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवरील केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना, महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना या ऑनलाईन पध्दतीने उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राज्यात राबविण्यात येतात. सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन पध्दतीने एनएसपी पोर्टल वरुन मागविण्यात येतात. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode ) जमा करण्यात येते.

तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणेसाठी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल दिनांक 30.06.2024 पासून कार्यन्वीत झाले असून सन 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून एनएसपी पोर्टलवरील सर्व शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणे करिता " **एक वेळ नोंदणी क्रमांक** " (OTR) व फेस-ऑथेंटिकेशन करणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरहू ओटीआर क्रमांकद्वारे विद्यार्थी नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज करु शकतील.

तसेच सन 2023-24 मधील नुतणिकरणाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या एनएसपी पोर्टलवरील नोदणीकृत दुरध्वनी क्रमांकावर एसएमएसद्वारे ओटीआर क्रमांक पाठविण्यात आले आहेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांना मोबाईल नबंरवर OTR क्रमांक प्राप्त झाला नसेल अशा विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल उपलब्ध "तुमचे ओटीआर जाणून घ्या" वापरुन पुन:प्राप्त केले जाऊ शकते. तसेच सर्व विद्यार्थ्यांना अधिक माहितीसाठी https://scholarships.gov.in/ या पोर्टलवरील FAQ पाहू शकतात. सोबत FAQ जोडण्यात आले आहे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 05-07-2024 11:40:24

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-01

प्रत-

1.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

2.मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, 3 चर्चपथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001

प्रत-

1. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, 03 महापालिका मार्ग, मुंबई
2. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
3. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, 03 महापालिका मार्ग, मुंबई.
4. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.
5. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी, दिंडोरी रोड नाशिक -422 004
6. कुलसचिव महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर 440 001
7. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-01.

यांनी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता 11 वी व 12 वी ) सूचना देण्यात याव्यात.

8.कुलसचिव, सर्व कृषी/अकृषी/अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

2/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

# National Scholarship Portal

OTR Related instruction to the students who have applied on National Scholarship Portal in AY 2023-24.


# OTR Related instruction to the students who have applied on National Scholarship Portal in AY 2023-24.

## A. Instructions to the students who have received the OTR no.


1. NSP earlier launched the face-authentication service in AY 2023-24 and it was optional for the students to perform their face-authentication.
2. NSP has generated the One Time Registration (OTR) no. for the students who have performed the face-authentication in AY 2023-24 and the same has been sent to the applicant through SMS on their registered mobile no.
3. Students who have received the OTR no. can directly apply for scholarship on NSP portal.
4. In case, the student has not received the OTR number through SMS, OTR no. can be retrieved using "Know your OTR" available on National Scholarship Portal.

## B. Instructions to the students who have received Reference no.

1. NSP has allotted the reference no. to the students who have completed the OTP based eKYC and have not completed their face-authentication in AY 2023-24.
2. OTR no. can now be obtained by completing face-authentication on NSP.
3. Following steps are required to generate the OTR no.:
   a. Download and install AadhaarFaceRD services in the android device. (link: https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.uidai.facerd)
   b. Download and install the NSP OTR App GET IT ON Google Play from the Google Play Store. (link: https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.scholarships.nspotr&pli=1)
   c. After opening the mobile app below screen will appear on your device. Select the option "**eKYC with FaceAuth**" highlighted in red. Refer screen on next page.




d. After clicking on **"eKYC with FaceAuth"** below screen will appear.




e. Enter the allotted reference number and click on **"Send OTP"** to receive OTP on your mobile no.


f. Enter the received OTP and captcha in the screen and click Next. Below screen will appear.




g. Click on "**Proceed for Face Authentication**" button highlighted in red in above screen.

h. UIDAI AadhaarFaceRD services will be invoked for face-authentication. Ensure AadhaarFaceRD services are pre-installed on your device. Refer point no. 3(a).

i. On Successful completion of face-authentication **OTR no.** will be generated (refer below screen) and will also be sent on your registered mobile no.




j. Student shall apply for scholarship using OTR no.

## C. Instructions to Applicants who have applied through Aadhaar Enrollment No (EID) in AY 2023-24

1. Applicants applied with EID in AY 2023-24 and have not furnished Aadhaar shall apply for OTR using option Get your OTR →"**Apply Now**"

(link: https://scholarships.gov.in/otrapplication/#/registration-page).

******

National Scholarship Portal

# Frequently Asked Questions (FAQ) on One-Time Registration

Anurag S Bishen

2024

# Frequently Asked Questions (FAQ) on One-Time Registration:

**1. What is One-Time Registration (OTR)?**

One-Time Registration (OTR) is a unique number provided to streamline the registration process. Users register with their mobile number and complete e-KYC (electronic Know Your Customer). Once this process is complete, an OTR number is generated and sent to the user's phone. This unique number allows users to log in and access various services without needing to re-register. The OTR number is generated once and remains valid throughout the student's academic career.

**2. What are the benefits of One-Time Registration?**

One-Time Registration (OTR) offers several advantages:

It helps in streamlining the registration process as OTR simplifies the registration process by providing users with a unique number after completing e-KYC. This eliminates the need for repetitive registration steps across different services.

It is convenient for the users as they only need to register once with their mobile number and complete e-KYC to receive their OTR number. This reduces the hassle of filling out multiple registration forms for various services.

The OTR number is generated once and remains valid throughout the student's academic career, providing a consistent and stable identifier for all related services.

By eliminating the need for repetitive registrations, OTR enhances the overall user experience, making it more convenient for traceability and tracking to access multiple services.

**3. Which portals typically use One-Time Registration?**

The NSP portal and other state portals may implement One-Time Registration (OTR) to simplify the registration process and ensure de-duplication.

4. **Is One-Time Registration mandatory for all services on NSP?**

Yes, One-Time Registration is mandatory for all services on NSP. It serves as the username for logging in and is also required to complete the face authentication process.

5. **What documents/information do I need to have ready to create my OTR?**

To create your OTR, student shall have:

**Required Documents/Information:**
1. Active mobile number
2. Aadhaar number
3. Mobile number linked with Aadhaar
4. NPCI Seeding status (desired)

**If you don't have an Aadhaar**

1. Active mobile number
2. Aadhaar enrolment slip or Parent's/Legal Guardian's Aadhaar (in case student is minor)
3. Mobile number linked with EID or Parent's Aadhaar
4. NPCI Seeding status (desired)

6. **Can I update my information after completing the One-Time Registration (OTR) process?**

Yes, you can update most of your information, including Aadhaar-related details and other personal information. This ensures that your profile remains accurate and up to date. If your Aadhaar information changes, you will need to perform e-KYC and face authentication again to update your details.

7. **How frequently should I update my One-Time Registration information?**

It's advisable to review and update your OTR information periodically, especially if there are changes to your personal details or contact information. Keeping your profile up to date ensures accuracy and enhances the effectiveness of the OTR system.

8. **Do I need to remember multiple application IDs with One-Time Registration?**

No, it is not required nor needed. Using the OTR number, you can retrieve all application IDs linked to it. Each candidate has a unique OTR, and all applications are linked to this single number. Additionally, all the application statuses will be visible, simplifying the process further.

9. **Can I use One-Time Registration across different devices?**

   Yes, OTR is designed to be accessible from various devices such as computers, smartphones, and tablets. As long as you have an internet connection, you can access your registered account from anywhere using the OTR No.

10. **Is there a fee associated with One-Time Registration?**

    No, One-Time Registration is free on NSP and its processes. It is a unique number based on your e-KYC details and registration mobile number. It is used to log into the application and does not require any payment.

11. **What is a Reference no?**

    A Reference no is assigned when users provide their own Aadhaar or their guardian's Aadhaar. It is sent to the registered mobile number to complete face authentication and to generate OTR number.

12. **What are the next steps after obtaining a Reference no?**

    Once you have a Reference no, log in to the Face Auth app and complete the face authentication process. After successfully completing face authentication, you will receive your OTR number.

13. **How long will my Reference no be valid?**

    Your Reference no will be valid until you complete the face authentication and KYC process. After this, your OTR will remain valid.

14. **What should I do if I forget my Reference no?**

    If you forget your Reference no, you can retrieve it using the "Forgot Reference no" option. You will need to provide the Aadhaar number used during your e-KYC to recover the Reference no.

15. **What happens if I forget my One-Time Registration credentials?**

    If you forget your OTR number, you can retrieve it by selecting the "Forgot OTR Number" option. To recover your OTR number, you will need to provide the Aadhaar number used during your e-KYC process.

16. **I have generated my reference no. How to complete my face-authentication and generate OTR?**

    Face-authentication is mandatory for generation of OTR. NSP has launched the Mobile App for android devices. Student is required to follow below steps for face-authentication and generation of OTR:

    1. Download and install the Face RD App from Google Play Store.

(link: https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.uidai.facerd)

2. Download and install NSP OTR [GET IT ON Google Play] App from Google Play Store.
   (link: https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.scholarships.nspotr&pli=1)
3. Complete the face-authentication using option "**eKYC with FaceAuth**" on NSP OTR Mobile App.

**17. I am facing difficulty while performing face-authentication**

Successful face capturing requires proper positioning and good lighting condition. To know more about the Aadhaar Face Authentication please visit **FAQ no. 21**. **(Link: https://uidai.gov.in/en/contact-support/have-any-question/303-faqs/authentication.html )**

**18. What should I do if I want to change mobile number registered in my OTR/Reference no?**

Mobile number registered with OTR /Reference no can be changed after successful Aadhar based OTP authentication. Once the student completes Aadhar based OTP Authentication successfully, the system will prompt them to enter new mobile number. After OTP verification of the new mobile no, the same will get registered in OTR/Reference no.

**19. What should I do if I haven't received the password after completing my OTR registration?**

The student should visit student corner on NSP and exercise "Forget Password" option available under OTR login. The same option can also be used to reset the existing password.

**20. What should I do if my Aadhar is already seeded with the bank account but on OTR it is showing "Not seeded"?**

The student is advised to click on "Aadhar Seeding -> Check it now" option available in the "Profile Details" section under OTR login.

*****

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर

ड विभाग, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर 413001

दूरध्वनी क्र. 0217-2324055 E-mail - jtdirhesol@rediffmail.com

जा.क्र. विससं/उशि/सोविसो/2024/ दि. 15/07/2024

प्रति,

1. कुलसचिव,
   पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ, सोलापूर
2. प्राचार्य,
   सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालये,
   सोलापूर विभाग.

विषय : केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेमार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विदयार्थ्यांसाइी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन 2024-25 च्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.I/457367/2024 दि.5/7/2024

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भांकीत पत्र व त्यासोबतच्या केंद्र शासनाच्या दि.1.7.2024 च्या ई-मेलची प्रत यासोबत जोडली आहे. सदर पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनांनुसार पत्रामध्ये नमुद केल्यानुसार तसेच त्यासोबतच्या सर्व सूचना विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात

तरी, संदर्भांकीत पत्रात नमुद केलयानुसार आपण विहित कालमर्यादेत कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

Signed by
Nalini Khemraj Tembhekar
Date: 16-07-2024 12:57:49

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग, सोलापूर.

HEPN-SCH2011/15/2024-SCHW1 E-2353599 I/457367/202

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-411 001


web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/29707098/26126939 फॅक्स 020/26111153


क्र.उशिसं-/शिष्य/दिव्यांगजन/2024-25 दिनांक

विभागीय सहसंचालक (उ.शि.)
सोलापूर विभाग सोलापूर
कार्यासन- आ.क्र.
क.प्र.अ. प्र.अ. वि.स.सं.

**परिपत्रक**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय : केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे मार्फत राबविण्यात येणा-या दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन 2024-25 च्या अंमलबजावणीबाबत.**

संदर्भ : केंद्रशासनाचे पत्र क्रमांक- File No. Z-11017/100/2023- SCH, दि. 01.07.2024

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रशासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे मार्फत दिव्यांगजन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्यक करणे या उद्देशाने दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सन 2024-25 मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरीता नविन मंजूरीचे (Fresh) आणि नूतनीकरणाचे (Renewal) अर्ज ऑनलाईन पध्दतीने एनएसपी पोर्टल वरुन मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode ) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती XI,XII, Post-Matriculation Diploma/Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree/Diploma from any University recognized by UGC/AICTE या अभ्याक्रमासाठीचे विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

**किमान पात्रता व अटी :**

1. दिव्यांगत्व टक्केवारी 40 टक्के किंवा त्यापुढील असावी.
2. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
3. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड लाभार्थी नसावा.
4. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.2.50 लाख पर्यंत असावे.
5. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल ( जर दुसरे व तिसरे आपत्य जुळे असतील तर सदर योजनेचा लाभ घेता येईल.)

**ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती:-**

1. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनूसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर आधार क्रमांक नमुद करुन अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे
2. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि.31.10.2024** ही आहे.
3. विद्यार्थ्यानां आधार आयडी (UDID) असने व तसेच लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या चालू स्थितीत (Operative / Active Mode) बँक खात्याशी सलग्न असणे आवश्यक आहे जेणेकरुन शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासठी आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम जमा करणे सुलभ होईल.
4. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरिता दिव्यांगजन असल्याचे ओळखपत्र (UDID) असणे आवश्यक आहे.
5. अर्जदारांनी अर्ज प्राप्त करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या तारखेच्या आत ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांचे अर्ज सादर करावेत. सर्व आवश्यक कागदपत्रे जसे की फोटो, वयाचा पुरावा, अपंगत्व प्रमाणपत्र, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, शिक्षण शुल्काची पावती अंतिम शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र इ. विहित नमुन्यात रीतसर भरलेले ऑनलाईन पध्दतीने अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच वरील सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावेत.
6. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधनू सदर अर्ज पुर्ण करुण घ्यावा. तसेच उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनालईन अर्ज भरावा.
7. जर उमेदवार एका राज्याचा कायमचा रहिवासी असेल परंतू दुस-या राज्यात शिकत असेल तर, सदर विद्यार्थ्याच्या अर्जाची शिफारस त्या राज्याच्या शिक्षण/कल्याण विभागाने केली पाहिजे ज्याचा तो कायम रहिवासी आहे.
8. एखाद्या विद्यार्थ्यांने खोटया कागदपत्राद्वारे शिष्यवृत्ती मिळवल्याचे आढळल्यास, त्याची/तिची शिष्यवृत्ती त्वरित रद केली जाईल आणि दिलेली शिष्यवृत्तीची रक्कम अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभाग, सरकारच्या निर्णयानूसार वसूल केली जाईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याला काळया यादीत टाकले जाईल आणि कोणत्याही योजनेतील शिष्यवृत्तीपासून कायमचे वंचित केले जाईल.
9. विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती ज्या अभ्यासक्रमासाठी प्रदान करण्यात आली होती त्या अभ्यासाच्या विषयामध्ये विद्यार्थ्याने बदल केल्यास दिलेली संबंधित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद करण्यात येईल.
10. सदर शिष्यवृत्तीची रक्कम भारत सरकारच्या अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाच्या मार्फत देण्यात येते, परंतू ज्या अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती प्रदान देण्यात आलेली आहे तो संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यास सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम परत करण्यास जबाबदार आहे. तसेच विद्यार्थ्यांला देण्यात आलेला देखभाल भत्ता 1 एप्रिलपासून किंवा प्रवेशाच्या महिन्यापासून, यापैकी जे नंतर असेल, परीक्षा पूर्ण झालेल्या महिन्यापर्यंत, शैक्षणिक

वर्षाच्या शेवटी देय असेल, परंतू जर विद्यार्थी महिन्याच्या 20 तारखे नंरत प्रवेश घेतला असेल तर प्रवेशाच्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून रक्कम देण्यात येईल.

11. मागील वर्षांमध्ये देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणाच्या बाबतीत, अभ्यासाचा कोर्स सतत चालू असल्यास, मागील वर्षात ज्या महिन्यापर्यंत शिष्यवृत्ती दिली गेली होती त्या महिन्यापासून देखभाल भत्ता देण्यात येईल.
12. विद्यार्थी जर एकाच वेळी दोन अभ्यासक्रमध्ये शिक्षण असेल तर कोणताही एकाच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल.
13. दुरस्त शिक्षण (Distance Education) घेणारे विद्यार्थी देखील सदर शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र असतील.

**शिष्यवृत्ती वितरणाची पध्दत :-**

1. शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या नवीन मंजुरीचे व नूतनीकरण्याचे विद्यार्थ्यांना DBT मोडद्वारे आधारशी लिंक केलेल्या त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम थेट जमा केली जाईल.
2. नवीन मंजुरीच्या विद्यार्थ्यांसाठी योजनेचा लाभ संपुर्ण देशात देण्यात येत असल्याने राज्य सरकारच्या संबंधित विभाग/नोडल अधिका-याने केलेल्या ऑनलाईन पडताळणीच्या आधारे आणि अपंग व्यक्तींच्या राज्यनिहाय लोकसंख्येची टक्केवारी लक्षात घेऊन, राज्यवार प्राप्त झालेल्या नवनी मंजूरीच्या अर्जांची संख्या पैकी पात्र अर्जांच्या एकुण संख्येच्या संबंधात टक्केवारीच्या अटींमध्ये रुपांतरित केली जाईल आणि त्यानंतर अपंग व्यक्तींच्या राज्य निहाय लोकसंख्येची सरासरी टक्केवारी आणि पात्र अर्जांची राज्यनिहाय टक्केवारीवर आधारित राज्यनिहाय शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या निश्चित केला जाईल. तसेच लाभार्थ्यांच्या निवडीसाठी योग्यता निकष अपंगत्व प्रमाणपत्रात दर्शविल्यानुसार अपंगत्वाची 40 टक्केवारी असलेला विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असेल व समान अपंगत्व टक्केवारी असेल तर ज्या विद्यार्थ्याचे वय जास्त आहे त्या विद्यार्थ्यास निवड यादी मध्ये प्राधान्य देण्यात येईल.
3. नूतनीकरण्याच्या विद्यार्थ्यासाठी जे विद्यार्थी अर्जांची अंतिम पडताळणी केंद्रशासनामार्फत केल्यानंतर पात्र ठरलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीची कालावधी आणि नूतनीकरण**

1. एकदा दिलेल्या शिष्यवृत्तीचा लाभ तो अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी ज्या टप्यावर दिली जाईल त्या टप्यापासून प्रभावी होईल आणि उपस्थितीत नियमितता असेल तरच पुढील शिक्षण होईपर्यंत त्याचे नूतनीकरण करण्यात येईल परंतू एकाच वर्गात दुस-यांदा बसल्यास दुस-यावर्षी विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.
2. जर एखादा विद्यार्थी आजारपणामुळे किंवा इतर कोणल्याही अनपेक्षित घटनेमुळे वार्षिक परीक्षेत बसू शकला नाही तर, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि/किंवा इतर आवश्यक पुरावे सादर केल्यावर पुढील शैक्षणिक वर्षासाठी सदरहू विद्यार्थी नुतनीकरणाचा अर्ज भरण्यास पात्र असेल.
3. एखाद्या विद्यार्थी ATKT घेऊण पुढील वर्गात प्रवेश मिळला असेल तर सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असेल.

**विद्यापिठ/महाविद्यालय/सस्थेसाठी सूचना :-**

विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीचा (Fresh) किंवा नूतनीकरणाचा (Renewal) चा अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अर्जांची छाननी करुन ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपद्धती पार पाडावी तसेच मंजुर केलेले अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन करुन ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी तसेच महाविद्यालयांनी विभागाने दिलेल्या युजर आय.डी. व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा सदर अर्ज अपात्र समजण्यात येतील.

दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक योजना सन 2024-25 साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/ प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना व SOP(standard operation procedure) या www.dhepune.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

उपरोक्त सूचना XI,XII, Post-Matriculation Diploma/Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree/Diploma from any University recognized by UGC/AICTE येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना/विद्यापीठांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी संचालनालयास सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 05-07-2024 11:34:37

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे-01

प्रत-

1.मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
2.मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, 3 चर्चपथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-411001

प्रत-

1. मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, 03 महापालिका मार्ग, मुंबई
2. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई
3. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, 03 महापालिका मार्ग, मुंबई.
4. मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.
5. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी, दिंडोरी रोड नाशिक -422 004
6. कुलसचिव महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर 440 001
7. मा.संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-01.
   यांनी त्यांच्या अधिनस्त असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना (इयत्ता 11 वी व 12 वी ) सूचना देण्यात याव्यात.
8. कुलसचिव, सर्व कृषी/अकृषी/अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

2/- सदर शिष्यवृत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

No Z-11017/100/2023-SCH
Government of India
Ministry of Social Justice and Empowerment
Department of Empowerment of Persons with Disabilities (Divyangjan)

5th floor Pt. DeendayalAntyodayaBhawan
C.G.O.Complex, Lodhi Road, New Delhi

Dated: 01.07.2024

Office Memorandum

As you are aware, the Department of Empowerment of Persons with Disabilities (DEPwD) is implementing three scholarships for students with disabilities through the National Scholarship Portal (NSP):

1. Pre-matric scholarships for Class IX and X
2. Post-matric scholarships for Class XI to Post-graduation and
3. Scholarship for Top Class Education for Graduate/Post Graduate Degree or Diploma

2. The registration of students on the NSP has commenced w.e.f **30th June, 2024.** The details of these schemes are available on the website of this Department (www.depwd.gov.in) and National Scholarship Portal (www.scholarships.gov.in). The last date for registration and submission of applications on the portal is **31st August, 2024** for **Pre-Matric Scholarship** and **31st October, 2024** for **Post Matric** and **Top Class Scholarship.**

3. Nodal Officers of all States/UTs are requested to suitably give wide publicity regarding the opening of the National Scholarship Portal (NSP) to enable eligible students to submit their applications for AY 2024-25. They are also requested to ensure that all institutes registered on NSP and their institute Nodal Officers are duly verified through e-kyc and Aadhaar authentication as per the NSP process.

(Pradeep A)
Director

To
1. The Nodal Officers of all States/UTs
2. The Director of all NIs/CRCs
3. The Member Secretary, RCIs

Copy to:
1. All Principal Secretaries of the Department of Social Welfare to all States/UTs.